डॉ. नितीन मोरे



# खरपट्या लटपट्या



एकांकी बालनाट्य

# खटपट्या लटपट्या

## (दोन अंकी बालनाट्य)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# खटपट्या लटपट्या

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १६ मार्च २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# खटपट्या लटपट्या

## डॉ. नितीन मोरे

***मराठी बालरंगभूमीला***

***रंगीबेरंगी करणाऱ्या***

***माझ्या सर्व बालकलाकारांना***

सप्रेम भेट

# खटपट्या लटपट्या

## (२ अंकी बाल नाटक)

डॉ.नितीन मोरे



## पात्रे

महाराज

प्रधान

सेनापती

खटपट्या

लटपट्या

शिपाई १ आणि २

अलबत्या गलबत्या

राजकन्या कर्णिका

सेट: राजाचा दरबार. सिंहासन. पाठी एका मोठ्या खिडकीतून बाहेर डोंगर, झाडे दिसताहेत असे दृश्य..

# अंक पहिला



# प्रवेश १

चार पात्रे नाचत गात आहेत. खटपट्या, लटपट्या, अलबत्या गलबत्या व राजकन्या कर्णिका

खटपट्या : मी खटपट्या

लटपट्या : मी लटपट्या

खटपट्या : मी खलबत्या

लटपट्या : मी बलबत्या

अलबत्या : हा खटपट्या

राजकन्या : तो लटपट्या

सगळे :

एक खट एक लट

एक लट एक खट

जाती इकडून तिकडून सारे

जणू वाहती खारे वारे

झटपट्या पटपट्या

खटपट्या लटपट्या..

खट्याळ थोडे लबाड थोडे
यांच्यावाचुनि अडती घोडे
स्टोरी आइका थांबूनी थोडे
गमतीदार ही असती दोघे
नसती बिलकूल कटकट्या
खटपट्या लटपट्या..

स्थळ : गडबडपुर. महाराज उल्लूकुमारांचा दरबार. महाराज सिंहासनावर बसलेले..

दरबारी : उल्लू महाराजांचा..

महाराज (स्वत:च) : विजय असो.. विजय असो.. विजय असो.. प्रधानजी..

प्रधान : काय महाराज?

महाराज : कोण आहे रे इकडे?

प्रधान : इकडे तुम्हीच महाराज..

महाराज : अरेच्चा! होच की! काहीतरी गडबड दिसतेय..

सेनापती : दरबारात गडबड.. (तलवार उपसत) आम्ही बघतो महाराज.. आम्ही मुंडक्याने तलवार उडवितो.. नव्हे.. तलवारीने मुंडके उडवितो..

महाराज : सेणापती, मुंडके उडवण्याची गरज नाही..

सेनापती : ठीके राहिले.. महाराज.. पण अशी कोणती समश्या आहे जी मुंडके उडवल्याविना सुटते? प्लीज .. उडवू द्या.. एक तरी मुंडके.. आजच धारवाल्याने तलवारीस धार करून दिलीय. आम्ही जातीने मुदपाकात त्या तलवारीने भेंड्या चिरून आलो आहोत. अत्यंत धारदार महाराज.. एकच मुंडके द्या मज आणुनि जे उडवीन मी तलवारीने..

महाराज : सेणापती.. सध्या त्या तलवारीस म्यानाची वारी करावी. नो ओंडके, नो मुंडके..

सेनापती : नो ओंडके नो मुंडके? मग ओंके महाराज..

(सेनापती तलवार म्यानात टाकता टाकता दोनदा चुकतो. अरेतिच्या.. म्हणत शेवटी ती म्यानात घुसवतो..)

महाराज : आज सकाळी आम्ही सवयीप्रमाणे कोण आहे रे इकडे बोललो..

प्रधान : बोललात..

महाराज : मग राणीसरकार म्हणाल्या..

प्रधान : म्हणाल्या.. काय म्हणाल्या?

महाराज : म्हणाल्या, इकडे आम्हीच आहोत..

प्रधान : महाराजांचा उल्लू..

महाराज : विजय असो.. पण आम्ही दोन ठिकाणी कसे? तेव्हा महालातही आम्ही. आता दरबारातही आम्ही..

प्रधान : उल्लू महाराजांचा..

महाराज : विजय असो.. विजय असो..

प्रधान : आपण सगळीकडे असता महाराज..

महाराज : सगळीकडे?

प्रधान : होय्य महाराज.. (खिडकीतून दिसणाऱ्या डोंगराकडे बोट दाखवत..) या डोंगरातील झाडात तुम्ही.. खोडात तुम्ही.. दगडात तुम्ही.. खडकात तुम्ही.. धोंड्यात तुम्ही.. कोंड्यात तुम्ही..

महाराज : मग इकडे कोण? आम्ही कन्फ्युजलो आहोत.. मग आता कसे करावे?

प्रधान : चतुर.. अति चतुर अशा बिरबलास पाचारण करावे..

महाराज : बिरबल? ते तर सुट्टीवर आहेत. सिक लीव्ह.

सेनापती : ते शिक पडलेत?

महाराज : त्यांच्या शेपटाचे केस गळताहेत.

सेनापती : बिरबलांच्या शेपटाचे?

महाराज : ते शिक नव्हे.. त्यांचे अश्वराज! त्यांच्या घोड्याच्या शेपटाचे केस गळताहेत. नि पुढच्या डाव्या पायाच्या खुराला झालेल्या खुरप्या रोगावर इलाज करण्यासाठी सुटी घेऊन गेले आहेत..

सेनापती : बिरबलांच्या पायावर खुरप्या महाराज? अतिगंभीर..

महाराज : बिरबलांच्या नव्हे.. त्यांच्या अश्वराजांच्या. कोण आहे रे इकडे?

प्रधानजी : इकडे आपणच आहात महाराज.. कोण आहे रे तिकडे म्हणावे महाराज..

महाराज : ग्रेट. प्रधानजी तुस्सी ग्रेट हो.. कोण आहे रे तिडके..

प्रधान : तिडके नव्हे तिकडे महाराज..

महाराज : ओके.. डन! (टाळी वाजवत) कोण आहे रे तिकडे?

खटपट्या नि लटपट्या दोघे आत शिरतात.. वय साधारण १५, काळया लायनींचा पांढरा शर्ट, वाढलेले अस्ताव्यस्त केस.. ढगळ पॅंट.. त्याचे खिसे भरलेले. शर्टचा खिसापण काहीतरी ठेवल्यासारखा फुल्ल.

दोघे : इकडे आम्ही आहोत महाराज!

महाराज : तुम्ही? कोण आहात तुम्ही? प्रधानजी, आमच्या दरबारात हे कोण? कोण आहेत हे दोघे? कुठेतरी बघितल्यासारखे वाटतात? की वाटत नाहीत?

प्रधान : कोण आहात तुम्ही? हू आर्यु?

खटपट्या : हू? आम्ही हू म्हणून काय विचारता? हू म्हणून व्हॉट विचारता..

लटपट्या : आणि व्हाय विचारता?

खटपट्या : आम्ही आहोत.. मी खटपट्या

लटपट्या : मी लटपट्या..

महाराज : खट आणि लट पट्या.. म्हणून तिकडे चालली होती खुडबूड.. लुडबूड.. आणि गुडबूड..

प्रधान : गुड नाही गड.. बूड नाही बड.. गडबड महाराज..

महाराज : अरेच्चा! गुडबूड नव्हे! गडबडच झाली की म्हणायची! पण हे दोघे कोण? आणि इथे कसे?

खटपट्या : महाराज, आम्हाला आहेत पाय दोन..

लटपट्या : मग चालतो आम्ही, अडवेल कोण..

खटपट्या : खेळतो कबड्डी.. हुतूतू.. हुतूतू.. चढवितो लोण..

महाराज : अरे, पकडा रे ह्यांना.. आणा एक गोण..

सेनापती : काय महाराज? कोणास पकडणे आहे? गणिम? गणिम दरबारात शिरला.. आम्ही असताना.. थांबा.. (तलवार काढायला लागतो. ती निघत नाही.. लटपट्या नि खटपट्या त्याला मदत करायला जातात..)

लटपट्या : मिशीवाले काका.. तलवार खरी आहे?

सेनापती : अर्थातच.. धारदार..

खटपट्या : लटलटू नकोस लटपट्या..

लटपट्या : मग खटपट करून काढ ती खटपट्या..

सेनापती : आरं सेणापतीचा काय धाक हाय की नाय? थांब खांडोळी खांडोळी करतो.. (तोवर तलवार बाहेर येते..)

सेनापती : हीच ती तलवार जिच्याने..

प्रधान : सकाळी भेंड्या चिरल्यात..

महाराज : ते सारे नंतर.. आता ह्या दोघा घुसखोरांकडे पहावे प्रधानजी..

प्रधान (टाळी वाजवत): शिपाई, दुर्बिण आणा..

(शिपाई दुर्बिण आणून देतो. प्रधानजी दुर्बिणीतून खटपट्या लटपट्यांना पाहात..)

प्रधान : एकाचा शर्ट पांढरा असून त्यावर काळे पट्टे अन दुसऱ्याचा काळा असून त्यावर पांढरे पट्टे आहेत महाराज. एकाच्या शर्टाचे तिसरे

बटण अर्ध तुटके अन दुसऱ्याचे दुसरे बटण पूर्ण तुटके आहे महाराज.. एकाचे नाक वाहाते असून.. दुसऱ्याचा कान..

महाराज : प्रधानजी.. हे काय सुरू आहे? व्हॉट गोइंग ऑन?

प्रधान : आज्ञा पालन महाराज. आपण सांगितले दोघांकडे पहावे.. आम्ही पाहात आहोत. दुर्बिणीतून.. ते जवळ असले तरी. महाराज गिव्हिंग हुकूम.. हॅव टू पाळ इट! महाराज, एकाच्या डोक्यावर चिमणीचे घरटे ..

महाराज : प्रधानजी, हे दोघे इकडे कसे आलेत? गनिम आत कसा नि कुठून घुसला.. याचा साद्यंत वृत्तांत द्यावा..

प्रधान : काय द्यावा महाराज?

सेनापती : वृट्टांट प्रधाणजी..

खटपट्या : म्हंजे रिपोर्ट प्रधानजी..

लटपट्या : साद्यंत म्हंजे

सेनापती : डिटेलवार प्रधाणजी..

प्रधान : दिला.. महाराज दिला.. साध्यंत दिला.. वृतांत दिला..

खटपट्या : तांत नाही, त्तांत.. वृत्तांत..

प्रधान : स्मॉल माऊथ बिग बाईट? महाराज मी या आगाऊ पोरांची आगाऊ खबर घेतो नि आगाऊ परत येतो.. नव्हे नुसताच परत येतो.

विल्बी राइट बॅक. ब्रेक के बाद.. कुठेही जाऊ नका! आलोच आम्ही..

लटपट्या आणि खटपट्या :

येतो आम्ही जाऊन आमच्या गावा
तोवर तुम्ही जरा घ्या हो खाऊ भावा..

मिलते हैं हम अभीच ब्रेक के बाद
बघा आमचा फोटो आली जर अमची याद..

(पडदा तात्पुरता पडत असतानाच पडद्यावर त्या दोघांचा फोटो प्रोजेक्ट होतो..)



## प्रवेश २

स्थळ : तेच

महाराज सिंहासनावर बसलेले. हातात मोबाईल घेऊन खेळत बसलेले.. पाठी दोन शिपाई बघताहेत.. प्रधानजी आणि खटपट्या लटपट्या आत येतात..

प्रधान : महाराज..

महाराज : शुss डोन्ट डिस्टुर्ब.. आम्ही कँडी क्रश खेळतो आहोत.. लेव्हल सतरा ..

खटपट्या : आम्ही मदत करू महाराज?

लटपट्या : अशा खटपटी लटपटी करण्यात हुशार आहोत आम्ही..

खटपट्या : म्हणून तर आम्हाला प्रेमाने खटपट्या लटपट्या म्हणतात..

महाराज : कामाची आहेत पोरं.. पण नाही. आधी कर्तव्य. आधी कारभार करतो .. म्हणजे आधी राज्यकारभार.. मग कँडी क्रश.. प्रधानजी..

प्रधान : होय महाराज.. ब्रेकनंतर पुन्हा आपले स्वागत आहे..

महाराज : ब्रेक? पण तुम्ही ब्रेक मध्ये ॲड्स नाही दाखवत?

प्रधान : त्या तर टीव्हीवर महाराज.. आम्ही तो तसा ब्रेक नाही मारला.. म्हणजे घेतला. आम्ही या ख आणि ल टपट्यांची ख बर बात घेत होतो.. ख रंच महाराज..

महाराज : ख रंच की काय? बोला! काय आढळलेय खवकशीत? नव्हे चवकशीत?

खटपट्या : काय सापडणार महाराज?

लटपट्या : खरंय महाराज.. आम्ही तोंडली परीक्षा दिली..

महाराज : तोंडली परीक्षा?

खटपट्या : महाराज, त्याच्याकडे नका देऊ लक्ष, तोंडी परीक्षा म्हणायचेय त्याला.. तोंडली नाय काय ल.. टपट्या!

प्रधान : होय महाराज.. तोंडली त्या सेनापतींनी तलवारीने चिरून टाकली. आम्ही तोंडी परीक्षा घेतली. हे दोघे कोठून कसे आले याची साध्यंत माहिती काढली आहे..

महाराज : साद्यंत..

प्रधान : होय महाराज.. साध्यंत..

महाराज : ठीकाय.. बोला.. साध्यंत तर साध्यंत.. त्यातून हेतू साध्य झाल्याशी कारण.. बोला..

प्रधान : ऐका..

गडबडपुरीच्या बाजूस आहे एक गाव
अडबडपुर म्हणून ऐसे त्याचे नाव..

त्या गावातूनी आली ही पोरं दोन
गडबडपुरी त्यांना नाही ओळखत कोण..

एक खरे की दोन्ही असती बहुत खट्याळ
काळ न वेळ न करती मस्ती न बघता घड्याळ..

नदीच्या पल्याड ओसाड असे त्यांचे गाव
पण दोघांचा काय विचारता थाट तुम्ही राव..

एक खटपट्या दुजा लटपट्या करत ऐसा जुगाड
करत भानगडी करीत खोड्या बोलत ऐसे लबाड..

महाराज : अस्सं.. लबाड लांडगे?

प्रधान :

नाही परंतु कावेबाज हे असती जरी लबाड
मस्तीखोर असती परंतु न घेऊन जाती घबाड

महाराज : पण प्रधानजी, हे इथे पोहोचलेस कसे?

प्रधान :

कथन करतो आम्ही सगळी कथा बिलंदरांची
घुसती बिळात चढती घरात असल्या या उंदरांची..

निघाले काल ते अडबडपुरातूनी घेऊन खिशामध्ये पेरू
म्हणती जातो गडबडपुरी अम्ही, पाहू कोण अडवित येरू!

गडबडती पाहून गडबडपुरीचा भक्कम तटी हा किल्ला
जाऊ म्हणती आत मध्ये दाखवून कसला बिल्ला

तिकडे आडवा आला शिपाई धिप्पाड काल्या रामोशी
म्हणाला, आत जाल याद राखा, येईल अंगाशी..

पोरं कसली दोघं ऐकती, लई लबाड द्वाड उनाड
म्हणती रामोशी दादा सा◌ॅरी, अन करू म्हणे जुगाड

तटबंदीमागे गेली पोरं, बघती फिरून फिरून
खट म्हणतो लट ला, आत जाता येईल का उडून?

खटपट्या :

असती पंख पक्ष्यासारखे तर झाले छान असते किती

लटपट्या :

मग कसला रामोशी, अन कसला कोणी, कुणाची नसती भीती

खटपट्या :

आलो असतो मग गडबडपुरात असले उंच उडून

लटपट्या :

न यावे लागले असते आम्हां असे दडून दडून..

प्रधान :

मग महाराज यांनी केले सांगतो काय..
म्हणती करूया काय.. कसे देवाने दिलेत हे पाय..

खटपट्या :

मी म्हटले लट ला हे बघ आहेत आपले पाय..
बावळट लट म्हणे, या बावीस सप्तमांशाचे करावे काय?

म्हटले हा ना चोको पाय, ना गणितातला पाय
हे तर आपले फूट, पद, पाद,चरण समजले का नाय?

प्रधान :

मग पाहून एक झाड ही खुश झाली माकडे
ख म्हणतो ल ला, चल चढ झाडावरती गडे

तटबंदीवरूनी पाहू काय चालले आत
बघू मारता येते का उडी, जमते का ती बात..

महाराज : अस्सं. म्हणजे माकडांसारखी झाडावरती चढून आलीत आत दोघं? बिन शेपटीची माकडं जणू..

प्रधान : होय महाराज. ते झाड खूप उंच आहे. सरसर चढले वर, इकडे तिकडे पाहिले, नि उतरले झरझर. त्या नारळाच्या झाडावरून कसे काय उड्या मारणार? दोघांनी खिशातले पेरू खात विचार केला.. चार वेळा विचार केला.. डोकं खाजवित विचार केला..

सेनापती : खाजणारंच डोकं.. भुतासारखे वाढलेत केस.. महाराज.. आम्हाला तर वाटतं या जंगलात वाघ नि सिंह पण राहात असणार..

महाराज : डोकेबाज आहात सेणापती.. एकदा या उंदरांची गोष्ट ऐकून घेऊया.. बोला प्रधानजी..

प्रधानजी : तर महाराज, त्या उंच झाडावरून उतरले दोघे, सरसर.. आणि दुसऱ्या बाजूला गेले भरभर.. तिकडे त्यांना भेटले कोण?

महाराज : कोण?

लटपट्या : एक बोलणारा मोर.. डोळ्यांवर काळा चष्मा.. लांब लचक पिसारा.. डोक्यावर तुरा

खटपट्या : अन चालण्यात तोरा..

लटपट्या : मी विचारलं, अरे अरे मोरा

खटपट्या : मोर म्हणाला, काय रे चोरा

लटपट्या : देतोस का आम्हाला पाठीवर लिफ्ट

खटपट्या : समज आहे बड्डे, माझी ती गिफ्ट..

लटपट्या : मोर म्हणाला, तिकिट आहे पैसे सात

खटपट्या : मी म्हटले, बस! सात! इतकीच ना बात!

लटपट्या : मग हा बसला पुढे नि मी मागे डबल सीट

खटपट्या : मोर म्हणाला उडतो मी, पकडून बसा नीट!

प्रधान : महाराज, अशा रीतीने मोरावर बसून आलेत दोघं आपल्या गडबडपुर किल्ल्यात. त्यांनी दिली दरवानांच्या हातावर तुरी नि पोहोचले असे ते पटकन किल्ल्यावरी..

लटपट्या : मोराला आम्ही दिले चौदा पैसे.. आणि चिंचा आंबटगोड

खटपट्या : मी ही विचारलं, मोरा मोरा, खाशील का पेरूची फोड?

लटपट्या : मी म्हणालो, हात लेका! तो काय आहे पोपट?

खटपट्या : पण ह्याचाच झाला पोपट.. मोर म्हणाला, दे मला नाहीतर तुम्हाला धोपट!

महाराज : कळलं आता प्रधानजी. आता पुढे..

प्रधान : पुढे काय? काही नाही. संपली यांची गोष्ट

लटपट्या : भरलं ना तुमचं पोस्ट?

महाराज : अशी कशी संपेल? प्रधानजी, हे दोघे इथे का आलेत त्याची साद्यंत माहिती द्यायची आहे बाकी अजून..

प्रधान : पण महाराज, तुम्ही तर फक्त कसे नि कुठून आलेत हे तेच विचारलेलेत महाराज.. का आलेत ते तर नव्हतेच विचारले..

सेनापती : असे कसे हो सांगकामे तुम्ही? महाराज, आम्ही काढतो सगळी माहिती नि देतो साद्यंत वृत्तांत.. तोवर प्रधाणजी, ही तलवार तुम्ही सांभाळा.. (प्रधानाला तलवार देतो..) हळू. धारदार आहे..

प्रधान : असेल. पण आजच्या भाज्या झाल्यात चिरून. आता तलवारीचे काय काम?

सेनापती : सांभाळून ठेवा. गणिमाचा खात्मा करायचा तिच्यानी. महाराज, आता आम्ही ब्रेक घेतो.. डोण्ट गो एनी व्हेअर.. वुई विल्बी राइट बॅक.. ब्रेक के बाद!

खटपट्या लटपट्या :

आम्ही जातो आमुच्या गावा आमचा रामराम घ्यावा
मागच्या ब्रेकात उरला खाऊ पुरवून पुरवून खावा..

मोरावर बसून आलो आम्ही खात खात कुल्फी
येतो आम्ही परत तोवर बघा आमचा सेल्फी..

पडदा पडत असताना त्यावर चष्मिस मोराच्या पाठीवर हातात कुल्फी घेऊन चोखत बसलेले ते दोघे असा फोटो प्रोजेक्ट होतो..

# अंक दुसरा



# प्रवेश १

स्थळ : दरबार.

सिंहासनावर एक शिपाई नं २ बसलेला आहे, एक पाय वर घेऊन, मांडी घालून. दुसरा बाजूला उभा..

शिपाई १ : काय रं, तुला काय वाट्टं? ती पोरं कोण आसतील? दिसाया तर बरी वाट्टात..

शिपाई २ : कोणास ठावं की. आन दिसन्याचं म्हनशील तर आता तू.. दिसतोस ग्वाड पन हायस का तसा?

शिपाई १ : तू पन ना लेका, एक चानस सोडाचा नाहीस.. कर भौ आमची टिंगल.. पन तुला काय वाट्टं?

शिपाई २ : हां. पोरं त हायत तशी चांग्ली.. गोड हायत. आन पोरांसारखी पोरं.. चुकली असतील रस्ता नि पोचली इकडं..

शिपाई १ : न्हाई रं. ती तर मुद्दामून आली म्हनं. गॉगल लावलेल्या मोरावर बसून!

शिपाई २ : माझा इस्वास न्हाई..

शिपाई १ : कशावर न्हाई? मोरावर बसून आले त्यावर?

शिपाई २ : न्हाई.. त्यो मोर काय खरंच गॉगल लावतो का त्यावर! कदी कुनी पाह्यला न आईकला. काला चष्मा लावलेला मोर..

शिपाई १ : आन पोरांना घ्यून उडनारा मोर?

शिपाई २ : पन शीट बेल्ट लावून उडला ना? न्हाईतर पोलिस फाइन माराचे! पन मला सांग, खरंच कुल्फी खाल्ली आसन का त्यांनी?

शिपाई १ : हात लेका! ती पोरं कुटनं आली, कशासाटी आली याहून तुला टेन्शन कसलं कुल्फी खाल्ली का याचं?

शिपाई २ : करावं लागतं ब्वा.. शिपाईगडी म्हनलं की समद्या गोष्टीवर सौंशय घ्यावा लागतो. उंद्या पोलिसात गेला तर?

शिपाई १ : कोन?

शिपाई २ : कोन काय लेका? म्याच. पोलिसच्या नोकरीचा फाॅरम भरलाय न्हवं. शिपायाचा पोलिस होईन तवा लायनीवर येशील गड्या.. ठोकशील मंग सलाम..

शिपाई १ : सलाम ठोकेन? त्या आधी बेड्या ठोकतील बेट्या..

शिपाई २ : का रं?

शिपाई १ : का रं काय? म्हाराजांच्या सिंव्हासनावर बसलाय आन इचारतो का?

शिपाई २ : आरं, जागा रिकामी व्हती म्हनून. लई गुबगुबीत हाय.. मांजरावानी!

शिपाई १ : गॉगल लावलेली की बिन चष्म्याची मांजर? पन तुला वाट्टं म्हाराज सोडून द्येतील दोगांना?

शिपाई २ : आरं.. मी सिंव्हासनावर बसलोय म्हंजे मी काय म्हाराज न्हाई.. पोरं ग्वाड आन गोंडस हायेत.. रामोशाला पाहून घाबरली असनार..

शिपाई १ : व्हय तर! तो किल्ल्या खालचा रामोशी. हे अगडबंब! रावनाचा औतार जनू. एक तोंडवाला रावन!

शिपाई २ : न्हाईतर तू ल्येका! तुला पाहून कुत्रंबी घाबरंना..

शिपाई १ : तुला काय माज्ह्या टिंगलखोरीचा पगार मिळतो व्हय रं? तुला ठावं हाय? त्यो रामोशी म्हाराजांच्या खास मर्जीतला हाये. उगाच न्हाई बनला किल्लेदार.. पन ही पोरं कुटनं आली?

शिपाई २ : तू झोपा झोडतो काय रं दरबारात?  कुटनं आली त्ये तर ठावूक हाय..

शिपाई १ : कोन? झोप?

शिपाई २ : झोप कशाला? पोरं! पोरं कशी आली ते ठावं .. पन कां आली त्ये न्हाई ठावूक! त्याचीच चवकशी करायला गेलेत ना शेनापती..

शिपाई १ : कायबी बोल भौ.. बिरबलभाऊ असतेना तर काम लई सोपं झालं अस्तं. आनि बिरबलभाऊंकडं त्ये हाये ज्ये तुज्याकडं न्हाई!

शिपाई २ : काय?

शिपाई १ : आरं.. काम करनारं डोकं!

शिपाई २ : आता कोन कोनाची टिंगलखोरी करतंय.. आइकताव मी पन.. (सिंहासनावरनं उठत) उटतो बाबा.. कोनी आलं नि पाह्यलं तर पंचायत व्हायची..

शिपाई १ पटकन सिंहासनावर बसतो

शिपाई १ : मला बी थोडं गुबगुबीत गादीवर बसू दे की! कुनी नाय येत इतक्यात! शेनापती बिज्ही हायेत. म्हाराज गेले महालात.. लंच ब्रेक! परधानजी पाठी गेले शेनापतींच्या..

शिपाई २ : कशाला?

शिपाई १ : ते लपून छपून पाहनार शेनापती काय करतात ते! गुप्तचर इभाग बी हाये ना त्यांचा..

शिपाई २ : मग ते आपल्याकडंबी बगत असतील?

शिपाई १ : न्हाई रं.. आपन छोटी मान्सं! पन तू म्हनतोस तर उटतो म्या हितून.. नगो बाबा नस्ती आफत!

दोघे सिंहासनाच्या बाजूला ताठ उभे राहतात. प्रधानजी आत येतात..

प्रधान : शिपाई, सगळीकडे चौफेर, चौकन्नी, चौकस नजर आहे की नाही?

शिपाई १ आणि २ : होय प्रधाणजी..

शिपाई १ : चौफेर

शिपाई २ : चौकन्नी

शिपाई १ : चौकस

शिपाई २ : चौकोनी..

प्रधान : शाबास! नजर कशी हवी? चौकोनी आणि चौरस! हुशार आहात..

शिपाई १ : चौरंगी..

शिपाई २ : हुशारी दावू नको.. नजर चौरंगी आसते व्हय रं? उंद्या म्हनशील नजर चौपाई आसते. कायपन! पन प्रधाणजी माझं पोलिसांत सिलेक्शण हुईल का?

प्रधान : अरे, एक प्रश्न आहे. त्याचं उत्तर दिलंस की थेट बिल्लेवाला पोलिस.

शिपाई १ : शिट्ट्या फुंकनारा? पट्टेवाला?

शिपाई २ : मंग. बगशीलच आईट माझी. प्रधाणजी विचारा प्रश्ण. हा प्रश्ण हे उत्तर.. मंग हा शिपाई.. हा पोलिस! सलाम ठोकशील लेका.. यू दे प्रश्ण..

प्रधान : असं नको, ज्याला उत्तर येईल तो पोलिसात भरती.. तू की तू.. पाहू कोणाचं डोकं चालतं!

शिपाई २ : म्हंजे माझंच की. डोकं चालाया मुळात ते आसाया हवं की न्हाई?

शिपाई १ : असं म्हनतोयस? मग दावतोच की! डोकं की खोकं.. प्रधाणजी, यू द्या प्रश्ण..

प्रधानजी : आपल्या राज्यात आज काय झालं?

शिपाई २ : हात्तिच्या हा प्रश्ण सोपाय.. म्या हुनार पोलिस. शिट्टीवाला..

प्रधानजी : प्रश्न हा नाहीए पण.. तर आपल्या राज्यात आज काय झालं?

शिपाई १ : खूप काही.. झालंच तर कोबडं आरवलं, सूर्य उगवला.. म्हाराज दरबारात आले.. शेनापतींनी तलवारीनं भाजी चिरली..

शिपाई २ : आसं उत्तर आसतं व्हय रं? ह्ये तर रोजीच घडतं. आज वेगळं काय घडलं इचारतात प्रधाणजी.. आन तेचं उत्तर मला ठाऊक हाये.. आज ती पोरं आपल्या राज्यात घुसली.. बरोबर हाये की न्हाई उत्तर प्रधाणजी?

शिपाई १ : हॅत्तेच्या, हे तर शेंबडं पोर पन सांगेल..

शिपाई २ : पन लेका तू कुटं बोल्ला?

शिपाई १ : कारन मी शेंबडा न्हाई..( बोलता बोलता शिंकतो. मग खिशातून रूमाल घेऊन नाक पुसतो.)

शिपाई २ : दिस्तंयच ते..

प्रधान : तर प्रश्न विचारतो.. ज्याचा जास्त अंदाज बरोबर तो पोलिसांत भरती होईल. दोघांचाही चुकला तर आहेतच परीक्षा नि भरती..

शिपाई २ : म्या तयार हाये. प्रश्णांच्या गोळया झाडा प्रधाणजी, म्या उत्तराचं चिलखत चढवितो.. आन आज पोलिस भरतीचं पत्र घ्यूनच घरी जातोय.. म्या पोलिस हुईन.. माझा पगार वाढंन.. मग बाईलला नवं लुगडं नि पोरानला नवं खेळणं..

शिपाई १ : तु न्हाई! म्या! पोलिस हुईन नि आइटीत घरी.. रूबाब रूबाब म्हनतात त्यो..

प्रधान : शिपायांनो, अजून प्रश्न विचारला नाही मी.. त्याआधीच सुटले सुसाट.. तर प्रश्न असा आहे की ही जी दोन पोरं आलीत ती इथे का आली असावीत? काही अंदाज? समजा तुम्ही पोलिस आहात. तर काही तर्क वापरून अंदाज?

पोलिसी डोक्याने नि पोलिसी खाक्याने..

शिपाई २ : हा तर लई मुश्किल सवाल जनू. सारे लोक ज्यासाठी डोकं खाजिवतात तो प्रशण? मला वाट्टं, पोरं आपला किल्ला बघाया आलेत? गडबडपुराचं नाव लई मोठं.. त्यात रामबहादूर शिपाई म्हंजे लई फेमस..

प्रधान : हा रामबहादूर कोण?

शिपाई २ : म्याच की प्रधाणजी.. गडबडपुराचा किल्ला लई मोठा नि पक्का लोखंडावानी.. त्योच बघाया आलेत.. न्हाईतर म्हाराजास्नी भेटाया..

शिपाई १ : न्हाई. चूक. पोरं आलीत ते ह्याच्च्यासाठी..

शिपाई २ : म्हंजी कशासाठी?

शिपाई १ : माज्या तोंडावर हाय उत्तर..

शिपाई २ : मंग यू दे की तोंडातून भायेर. आत कशापायी लपवून ठेवितो.. यू दे.. उघाड तोंड..

(शिपाई १ तोंड उघडतो.. शि.२ आ आ आ आ करून तोंडासमोर हात करतो..)

शिपाई १ : म्या न्हाई गड्या. तू आसं करून शब्द आडकावून टाकिले गळ्यात.. आता म्या न्हाई बोलायाचा..

प्रधान : अजून काही अंदाज?

शिपाई २ : लई मुश्किल सवाल प्रधाणजी. दुसरा कुटलाबी इचारा की प्रश्ण.. आसं ताडकनी उत्तर नि फाडकनी पोलिस बनतो की न्हाई..

प्रधान : काही नको.. महाराज येण्याची वेळ झाली. सगळी व्यवस्था व्यवस्थित लावा.. सिंहासनाच्या सिंहांच्या आयाळीचा कंगव्याने भांग पाडा.. मी तोवर येतोच. सेनापतींची चौकशी कुठवर आली ते पाहतो.. महाराज लंच ब्रेक वरून येतील. त्यांच्या ढेकराचा आवाज आला की घोषणा द्या.. उल्लू महाराज की जय.. हुशारीत रहा, तयारीत रहा.. तोवर आम्ही घेतोय एक ब्रेक.. कुठेही जाऊ नका.. वुई विल्बी राइट बॅक..

शिपाई १ आणि २ :

कुटंत ते खटपट्या लटपट्या पाहू
पोरांनो जरा दम खा की, कुटं नका जाऊ..

शेणापती पोरांच्या लागले मागे
सापडत्यात का बघती कुटले धागे..

आम्ही येतो परतूनी तोवर पहा ह्यो पडदा
पडद्यावर फोटू दोघांचा शेणापतींसमोर दिडदा..

पडदा पडतो.. त्यावर सेनापती हात तलवारी सारखा उगारलेला नि समोर खटपट्या लटपट्या कान धरून उभे.. असा फोटो प्रोजेक्ट होतो..



# प्रवेश २

स्थळ तेच.

पाठून महाराज जोरात जोरात ढेकर देत असल्याचा आवाज..

शिपाई १ आणि २ सरसावून उभे राहात : ढेकरानंद महाराज येत आहेत.. सावधान.. निगाह रखो.. आगाह रखो.. महाराजको जगाह रखो..

महाराज आत शिरताना पोटावर हात फिरवतात. ढेकर देत सिंहासनावर बसतात..

महाराज : जेवणानंतर ढेकर देण्याइतका आनंद जगात दुसऱ्या कोणत्याही गोष्टीत नाही बरं..

शिपाई : उल्लूमहाराजांचा..

महाराज : विजय असो .. विजय असो.. विजय असो.. कुठेत ते सारे? सेणापती? प्रधानजी? ती द्वाड पोरं?

शिपाई १ : येतच असतील म्हाराज. शेनापती सोत्ता छडा लावायला गेलेत..

शिपाई २ : आन प्रधाणजी शेनापती कुठंयत ते पाह्यला गेलेत.. जाताना बोलून गेलते, महाराजांच्या तोफांच्या गर्जनेसारखा ढेकराचा आवाज यीलच तोवर त्ये परत येतीलच.. येतच असत्याल..

शिपाई १ : आता चवकशी म्हनली की थोडा उशीर व्हायचाच!

प्रधान, सेनापती आणि दोघं मुलं दरबारात येतात..

प्रधान : क्षमा महाराज. थोडा झाला लेट, पण सेनापतींना घेऊन आलो थेट!

खटपट्या : आणि महाराज, महालाचे उघडे होते गेट!

लटपट्या : म्हणून आत घुसलो जणू जंबो जेट..

महाराज : आता तरी सेणापती लागला का छडा?

सेनापती : छडा? वापरली छडी पण न लागे छडा. या पोरांना म्हटले, बोला घडाघडा..

प्रधान : मग, बोलले नाहीत काही?

सेनापती : बोलले ना.. काही नाही.. बोलले ते काहीही. कशाचा पत्ता कशाला नाही.. अडबडपुरातून पेरू घेऊन आले.. मग चढले झाडावर.. मग उडाले बसून मोरावर..

प्रधान : गॉगलवाल्या मोरावर..

महाराज : हे सारं ठाऊकच आहे.. पण आता पुढे काय? कशासाठी शिरलाय हा गनिम?

सेनापती : गणिम? कुठेय? अरे बाप्रे! तलवार कुठंय आमची? गणिमा येऊ नको परतून.. पळून जाशील आमच्या तलवारीची धार बघून..

(बाजूला जमिनीवर म्यानासकट तलवार पडलेली असते, ती उचलत) ही पहा, आमची तलवार.. जी करेल गणिमावर वार! सोमवार ते शुक्रवार!

प्रधान : आणि शनिवार, रविवार?

सेनापती : वीकेन्ड! ऑफ असतो आमचा. नो गणिम नो मुनिम..

महाराज : असू द्यात,पण त्या आधी ह्या ख आणि ल टपट्यांची काही खबरबात? कशासाठी आलेत इथे?

सेनापती : काही कळत नाही. अन दाखवला धाक तरीही ही पोरं वळतही नाहीत नि पळतही नाहीत. गणिम म्हणावे तर वागणे तसे नाही.. कां घुसले दरबारात.. कारण दिसत ही नाही ..

प्रधान : (शिपाई २ कडे न बघता.. फक्त महाराजांकडे पाहात) कदाचित महाराज गडबडपुराची कीर्ती ऐकून आले असतील. महाराज उल्लूकुमार सगळीकडे फेमस! आपल्या ह्या गडबडपुर किल्ल्याची महती गावोगावी पसरलेली.. त्यामुळे आली असणार आत..

महाराज : पण त्या मोराला ट्रान्सपोर्ट लायसन कुणी दिलं? ते ही डबल सीट? तातडीने तपास करा.

सेनापती : होय महाराज! गणिम मोराची तातडीणे चवकशी.. उडत्या मोराची पिसे मोजितो आम्ही. मोर मारे मारेल किताही गमजा.. चवकशी झालीच म्हणून समजा..

खटपट्या लटपट्या (गातात) : समझो हो ही गया!

महाराज : पण त्या आधी हे ख आणि ल टपट्यांचे प्रकर्ण संपवा..

खटपट्या : प्रकरण नाही महाराज..

लटपट्या : खरंच नाही महाराज..

महाराज : प्रकरण नसेल तर असेल धडा.. तुम्ही बोला दोघे घडा घडा.. इकडे आलात कसे? नव्हे कशाला? नाहीतर परत ती मोरावर बैसोन माझा लटपट्या आला अशी आरती गायचा हा खट्याळ खटपट्या..

खटपट्या : आमचं आधीच सांगून झालेय.. महाराज. हे सेनापती.. मिशीवाले काका आहेत ना यांच्या मिशीच्या डाव्या बाजूची शपथ ..

लटपट्या : अन माझी उजव्या बाजूच्या मिशीची शपथ..

खटपट्या : आम्ही अडबडपुरातील मुलं.. आमचा अलबत्या गलबत्या हरवला.. त्याला शोधतोय आम्ही..

लटपट्या : होय महाराज. अलबत्या गलबत्या.. गेला तो आलाच नाही. त्यालाच शोधतोय..

महाराज : अलबत्ता?

प्रधान : नाही खलबत्ता असेल..

सेनापती : हीच रेकाॅर्ड महाराज.. हीच रेकाॅर्ड कधीपासून लावलीय.. किटले आमचे कान.. अन दुखली आमची मान..

प्रधान : ती मान दुखली कशी काय? ऐकून ऐकून कान किटतील.. मन दुखावेल.. पण मान?

सेनापती : ते तुम्हास नाही कळावयाचे. दरवेळी हा खटपट्या तीच तीच गोष्ट सांगतो.. आम्ही नाही नाही म्हणून मान हलवतो.. हा लटपट्या सांगतो.. आम्ही परत नाही म्हणत मान फिरवितो.. असं करून करून मान दुखावली ,आमची..

महाराज : अस्सं! कानदुखी अन मानदुखी! आता ही पोरं म्हणजे अगदी डोकेदुखी झालीयेत.. डोकेदुखी!

प्रधान : ते नाव काय म्हणालात? अलबत्या?

महाराज : नाही, गलबत्या..

सेनापती : नाही, अलबत्या गलबत्या.. दोन्ही! एकाच वेळी एकाच माणसाचे एकच नाव आहे..

खटपट्या : मग! आहेच तो असा एकुलता.. अलबत्या गलबत्या.. कधी भेटेल?

लटपट्या : कसा भेटेल?

खटपट्या : लटपट्या, त्याचे राजकन्येशी लागले लग्न.. ती गडबडपुराचीच राजकन्या..

लटपट्या : तो गलबत घेऊन निघाला.. तो आजवर परत आलाच नाही..

महाराज : आमच्या कर्णिका राजकन्येचा जाहला विवाह.. पण ती अशा चित्र विचित्र नावाच्या अलबत्या गलबत्याशी नाहीच विवाह करणार..

बाहेरून गडबडीचा आवाज..

महाराज : हे काय सुरू आहे? शिपाई.. बघ जरा..

शिपाई १ : होय महाराज..

शिपाई २ : हुकूम महाराज..

दोघे जातात.. नि परत येतात..

दोघेही : राजकन्या कर्णिका व तिचे पतिराज येत आहेत दरबारात महाराज.. आपल्या दर्शनाला महाराज..

अलबत्या गलबत्या नि कर्णिका राजकन्या दोघे आत येतात.. पाठमोरे असल्याने खटपट्या लटपट्यांना ते दिसत नाहीत..

अलबत्या : हाय सासरेबुवा .. आम्ही महालाबाहेर प्रस्थान करण्यापूर्वी भेटावयास आलो आहोत..

खटपट्या : लटपट्या हा तर अलबत्या गलबत्याचाच आवाज..

लटपट्या : होय की! अलबत्या गलबत्या.. आम्ही इथे आहोत..

अलबत्या गलबत्या दचकून पाठी पाहातो.

अ.गलबत्या : अरे, तुम्ही दोघे? आणि इथे? इथे कसे? कर्णिके, हे माझे भाऊ.. लहान भाऊ.. हाय ब्रो..

दोघे जाऊन त्याला चिकटतात..

अ.गलबत्या : सासरेबुवा, हे अडबडपुरातले माझे भाऊ दोघे.. हा खलबत्या नि हा बलबत्या..

महाराज : अस्सं, पण ह्यांनी तर नाव खटपट्या लटपट्या सांगितलीत..

अ.गलबत्या : सासरे, ती नामे नव्हेत, विशेषणे आहेत! नावं खलबत्या नि बलबत्या! खटपटी आणि लटपटी करण्यात दोघे तरबेज.. म्हणून तशी गुणवाचक विशेषणे पडलीत नावे म्हणून! खटपट लटपट करूनच तर इथवर पोहोचले असणार .. नाहीतर ह्या लोखंडी किल्ल्यात कसे कोणी येऊ शकणार?

खटपट्या : पण दादा, आम्ही तुझी वाट पाहातो आहोत.. कधीच घरी नाही आलास?

अ.गलबत्या : ब्रो, ही सारी त्या चिंकी चेटकीणीची करामत..

खटपट्या : चेटकीण?

लटपट्या : चिंकी चेटकीण?

अ.गलबत्या (हातातील घड्याळाकडे पाहात) : सहा वर्षं सहा महिने सहा दिवस सहा तास सहा मिनिटं सहा सेकंद झालेत मला घरून निघून. माझं गलबत अडकलं किनाऱ्यावर. तिकडे भेटली ती चिंकी चेटकीण. तिने शाप दिलाय.. इकडून बाहेर गेलो तर वटवाघूळ बनवेल ती मला.. मग झाडावर उलटा टांगला जाईन मी..

खटपट्या : पण चेटकीण खरी नसतेच.. गोष्टीत असते फक्त..

अ.गलबत्या : नाही रे. ही भेटेपर्यंत मला ही वाटायचं तसं. पण ह्या चिंकीने शाप दिलाय त्यातील अजून (घड्याळाकडे पाहात) सहा दिवस सहा तास सहा मिनिटं सहा सेकंद बाकी आहेत.. मग चेटकीणीचा शाप संपेल. मग मी मोकळा.. या कर्णिकेला घेऊन येईन घरी.. ब्रो..

खटपट्या : म्हणजे आमची बातमी खरीच.. राजकन्येशी लग्न झालं तुझं..

लटपट्या : मग, मी आणलेली ती बातमी..

खटपट्या : ॲहा रे, मीच सांगितली तुला.. मग सहा दिवस सहा तास सहा मिनिटे सहा सेकंदानंतर तू घरी येणार?

अ.गलबत्या : नाही.. सहा तास चार मिनिटानंतर..

लटपट्या : पण तू सहा तास सहा मिनिटं बोललास?

अ.गलबत्या : अरे, दोन मिनिटं बोलता बोलता संपलीत की!

खटपट्या : खरंच की!

लटपट्या : मग सहा दिवस पण असेच संपतील..

महाराज : सेणापती, सापडले उत्तर.. ह्या भूषणकुमारास शोधण्यास बाहेर पडले दोघं. खटपटी लटपटी करून इथवर आले..

प्रधान : पण भूषणकुमारांचे नाव असे अलबत्या गलबत्या आहे हे ठाऊकच नव्हते आपल्याला..

कर्णिका (लाजत) : मला होते ठाऊक! आधीपासूनच! हृदयात असतात दोन दोन जवनिका.. अलबत्यारावांचं नाव घेते उल्लुकुमारांची कर्णिका!

अ.गलबत्या : सो, सासरे, माझं नाव अलबत्या. गलबत घेऊन दूर देशी जातो म्हणून गलबत्या. आणि हे खलबत्या बलबत्या म्हणजे माझे लाडके.. ब्रदर्स.. ब्रो.. कम.. लेट्स जस्ट डॅन्स..

सगळे नाचत गातात..

सारे मिळूनी नाचू सारे, गाऊ सारे
खाऊ खाऊन बागडू सारे..

अल गल खल बल बत्या बत्या
खट पट लट पट
खट पट्ट्या लट पट्ट्या
गलबतात बसूनी जाऊ सारे..

खटपट लटपट केली पटपट

घरास जाऊ आता झटपट

कसे ही जाऊ करूनी खटपट

खट्याळ लब्बाड जे ते सारे..


पडदा पडतो.. पडलेल्या पडद्यावर सर्व पात्रांचा एक फोटो प्रोजेक्ट होतो..




खटपट्या लटपट्या

डॉ. नितीन मोरे यांची ४३+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल

































डॉ. नितीन मोरे





# डॉ. नितीन मोरे यांची ४२+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यस) पुस्तक उघडेल.
























डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच



डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका



डॉ. नितीन मोरे
केल्याने



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



अंजनईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी'कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


जॅक्सन...
Jackson!


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
तेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ...


सुलट
२४६
डॉ. नितीन मोरे

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे सेहचाळीसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभिरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९),

शुभांगी पासेबंद(१६), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४६), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२८), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(१३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (६), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (६)  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक

नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "ई"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)